**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६९/२०१९** **दिनांक २७/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २१/०८/२०१९ ते २७/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २८/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून ०१/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१/०८ | २२/०८ | २३/०८ | २४/०८ | २५/०८ | २६/०८ | २७/०८ | | २८/०८ | २९/०८ | ३०/०८ | ३१/०८ | ०१/०९ |
| ३.० | ३३.४ | ६.० | १.२ | ५.४ | २२.५ | ०.२ | **पाऊस (मिमी)** | २५ | ३० | २५ | ३० | २० |
| ३१.४ | ३१.८ | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २४.८ | २३.५ | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २६ | २६ | २६ | २६ |
| ६ | ८ | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ५ | ५ | ८ | ८ |
| ९३ | ९७ | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९२ | ९३ | ९४ | ९४ |
| ८९ | ८३ | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७४ | ७५ | ७८ | ८३ | ८२ |
| ३.५ | १.७ | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १० | १० | ११ | ८ | ९ |
| इ.पु. | शांत | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | आ.द. | द. | आ.द. | द. | द. |
| | | | | | | | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | | | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** | | |
| **७१.७** | | | | | | | **३५९०.४** | | | **३५५८.३** | | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २८ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.**

**दिनांक २३ ते २९ ऑगस्ट, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पोटरी अवस्था** | • भात पिक पोटरी अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करून भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात देण्यात यावा.<br>• पाउसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे व सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. खाचरात पाणी जास्त काळ न साठता २-३ दिवसांच्या अंतराने फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे तसेच सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी शेतात पाणी बांधून पिकावरून एक जड दोर आडवा धरून ओढत न्यावा त्यामुळे सुरळ्या पाण्यात पडतील. नंतर एक ते दोन तासांनी शेतातील पाणी एका बाजूला फोडून लावावे व सर्व सुरळ्या एका ठिकाणी जमा झाल्यावर नष्ट कराव्यात.<br>• पुढील पाचही दिवस आर्द्रता आणि तापमानात वाढ संभवत असून यामुळे भात पिकावर कडा करपा ह्या जीवाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. कडा करपा रोगामुळे पानांचे शेंडे आणि कडा पिवळसर रंगाच्या होतात व रोगग्रस्त रोपांची पाने कडेकडून मध्य शिरेच्या दिशेने करपतात. सकाळच्या वेळेस पानांच्या खालच्या बाजूला दुधाळ रंगाचे दवबिंदू साचलेले दिसून येते. रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी स्टेप्टोसायक्लीन ५ ग्रॅम आणि कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून एकत्रित फवारणी करावी. पुढील दोन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने घ्याव्यात. (सदर बुरशीनाशके लेबल क्लेम नाहीत). |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण तयार होत असून पालवीचे किडी आणि रोगांपासून पासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. + बाविस्टीन २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फलधारणा** | • ढगाळ वातावरण व आर्द्रतेमुळे वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये केवडा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत व मॅन्कोझेब किंवा झायनेब २.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.<br>• वांगी, मिरची, कारली, पडवळ, दुधीभोपळा, दोडका भाजीपाला पिकावर पाने खाणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे, मावा इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मेलाथिओन २० मिली किंवा डायमिथोएट १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर' रक्षक सापळे भाजीपाला क्षेत्रामध्ये जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर प्रति हेक्टरी ४ लावावेत. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**